# VJTI MUMBAI
## वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
## Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिष्य/अ.जा.भा.स.शि/रक्कम भरणे/२०२१-२२/३७६६/२०२२ दिनांक:.१७.१०.२०२२
18 OCT 2022

परीपत्रक :

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ची महाडीबीटी वरील महाविद्यालयाची शिष्यवृत्तीची ६०% रक्कम विद्यार्थ्यांनी संस्थेच्या खात्यात भरणेबाबत**

संस्थेतील सोबत जोडलेल्या यादीतील अ.जा. (S.C) च्या विद्यार्थ्यांना सदर परीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय दिनांक: १७ मार्च, २०२२ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता अनुसूचित जातींच्या (SC) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अंतर्गत महाविद्यालयास देय असणारी ६०% रक्कम व विद्यार्थी निर्वाह भत्ताची ६०% रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बॅक खात्यात जमा करण्यात आली आहे. त्यातील विद्यार्थ्यांना देय असणारा निर्वाह भत्ता (६०%) वजा करता उर्वरीत महाविद्यालयास देय असलेली शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांनी महाडीबीटी यांसकडून जमा झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या बॅक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. शिष्यवृत्तीची एकूण किती रक्कम विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या खात्यात भरावयाची आहे याकरीता विद्यार्थ्यांनी प्रथम संस्थेच्या शिष्यवृत्ती लिपिक यांच्याशी संपर्क साधावयाचा आहे. सदर रक्कम जमा केल्यानंतर त्या पावती ची प्रत शिष्यवृत्ती विभागात आणून द्यावयाची आहे. सदर रक्कम विद्यार्थ्यांनी विहीत वेळेत संस्थेच्या खात्यात न भरल्यास आपल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**खालील पध्दतीने विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची रक्कम भरणा करावी**

**SBI Collect** – Proceed
**State of Corporate / Institution** – Maharashtra
**Type of Corporate / Institution** – Educational Institutional
**Educational Institutional Name** – VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE – Submit
**Select Payment Category** – VJTI return of MAHADBT Scholarship sixty percent

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA, MUMBAI -19.

संचालक

17/10/22

सोबत :

शासन निर्णय आणि विद्यार्थ्यांची यादी

प्रत : सर्व विभागप्रमुख, मुलामुलींचे वसतीगृह, संस्थेचे संकेतस्थळ

Scanned with CamScanner